महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३५१ वा दिनांक : ०५/१२/२०२५ वार : शुक्रवार

## स्थानिक निवडणुकीच्या धामधुमीत मतदारयादीत घोळ

**ठाणे :** सध्या महाराष्ट्रात निवडणुकीचे वातावरण असून स्थानिक निवडणुकांचे वारे वाहत असतानाच मतदार यादीत घोळ असल्याचे समोर येत आहे. काही ठिकाणी दुबार तिबार मतदारांची नोंदणी झालेली आहे, तर काही मतदारांचे पत्तेच बदलले आहेत. आता तर ठाण्यातील माजी नगरसेवकाचेच नाव मतदार यादीतून वगळण्यात आल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

ठाणे शहरातील माजी नगरसेवक सुधीर भगत यांचे नाव नगरपालिका निवडणुकांसाठी अंतिम झालेल्या यादीतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे भगत यांनी निवडणूक आयोगाकडे धाव घेत तक्रार दाखल केली होती. यात गेल्या वर्षीच्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आपण येथील प्रभागातून मतदारसंघातून मतदानाचा हक्क बजावल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर अनावधानाने सुधीर भगत यांचे नाव वगळण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाने मान्य केले आहे.

सुधीर रामचंद्र भगत यांचे नाव विधानसभा २०२४ च्या निवडणुकीसाठी आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मतदारयादीत समाविष्ट होते आणि त्यांनी मतदानाचा हक्कही बजावला होता. तथापि, आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या पार्श्वभूमीवर नोव्हेंबर २०२५ मध्ये त्यांनी ऑनलाईन तपासणी केली असता त्यांचे नाव मतदारयादीतून वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यांनी मतदार नोंदणी अधिकारी, १४९ मुंब्रा कळवा विधानसभा मतदारसंघात चौकशी केली असता, मार्च २०२५ मध्येच वगळणी करण्यात आल्याचे त्यांना सांगण्यात आले. या वगळणीबाबत त्यांना कोणतीही सूचना किंवा म्हणणे मांडण्याची संधी दिली गेली नाही, तसेच वगळणीसाठी दाखल केलेला 'नमूना क्र. ७' अर्जावरील स्वाक्षरी आपली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

या प्रकारानंतर, सुधीर भगत यांनी नाव वगळणीबाबत विलंबाने अपील अर्ज दाखल करून तो ग्राह्य धरण्याची विनंती केली. भगत हे त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी ७०-७५ वर्षांपासून कुटुंबासह राहत असून प्रतिष्ठित व्यक्ती आहेत. विशेष म्हणजे, यादी भाग क्र. २४२ चे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सदर नाव वगळणीबाबत कोणताही अहवाल सादर केला नव्हता. सर्व बाबींचा विचार केल्यानंतर आणि झालेल्या चुकीची नोंद घेत, अखेर निवडणूक आयोगाने आपली चूक मान्य केली आहे.

मतदार नोंदणी अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुधीर रामचंद्र भगत नावाच्या दोन भिन्न व्यक्ती मतदार यादीत होत्या आणि याच अनवधानात वादी (तक्रारदार) यांचे नाव वगळले गेले. या वगळणीची माहिती वादी यांना वेळेवर मिळाली नसल्याने त्यांनी मुदतीत अपील दाखल केले नव्हते. मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी हा विलंब माफ केला. जिल्हा प्रशासनाने हे मान्य केले की वादी यांचे नाव सन १९९५ पासून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ पर्यंत १४९ मुंब्रा कळवा विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत सातत्याने समाविष्ट होते. या कबुलीमुळे अखेर तक्रारदारास दिलासा मिळाला आहे.

## १७ ईव्हीएमचे सील तोडून पुन्हा मतदान




**मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये बोगस मतदान, दडपशाही व सर्व नियम धाब्यावर बसवून मतदान झाले. गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा नगर पंचायतीचे मतदान संपल्यानंतर 17 ईव्हीएम मशीनचे सील तोडून पुन्हा मतदान केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पण अद्याप एफआयआरही दाखल करण्यात आला नाही. हा सर्व प्रकार लोकशाहीचे वस्त्रहरण करणारा आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, राज्यात 10 वर्षानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. परंतु या निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्ष, प्रशासन व निवडणूक आयोग यांनी निवडणूक प्रक्रियेची थट्टा केली आहे. काँग्रेस पक्ष सातत्याने निवडणूक प्रक्रिया सुधारण्यावर भर देत आहे. मतचोरी, मतदार याद्यांमधील घोळ, यावर आवाज उठवत आहे, पण त्यात काहीही सुधारणा होताना दिसत नाही. निवडणूक आयोगाने आतातरी डोळे उघडावे. निवडणूक आयोगाला टी. एन. शेषन यांच्यासारख्या कणखर निवडणूक आयुक्ताची गरज आहे. मतचोरी प्रश्नी काँग्रेस पक्षाने 14 डिसेंबर रोजी दिल्लीत देशपातळीवर मोठी रॅलीही आयोजित केली आहे, असे सपकाळ म्हणाले.

राज्यात मे महिन्यापासून ऑक्टोबर महिन्यापर्यंत पावसाने धुमाकुळ घातला. शेतातील पिकं वाहून गेली, शेत जमीन खरडून गेली, सर्व हंगाम वाया गेला, शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. सरकारने 33 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिल्याचे जाहीर केले, पण ते कोणाला मिळाले हे माहित नाही. केंद्र सरकारकडे नुकसान भरपाईसाठी प्रस्तावही पाठवला नाही. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी लोकसभेत महाराष्ट्र सरकारची लाज काढली. महाराष्ट्र सरकारने प्रस्ताव पाठवला नाही हे केंद्रीय कृषी मंत्र्यांनीच सांगितले, यावरून भाजपा महायुती सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किती खोटे बोलतात हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. केंद्र सरकारकडून राज्याला निधी आणला नाही व प्रस्तावही पाठवला नाही कारण भाजपा महायुती सरकारला शेतकऱ्यांना मदतच करायची नाही, असे सपकाळ यांनी म्हटले आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारचे १ वर्ष बौद्धिक व आर्थिक दिवाळखोरीचे ठरल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, राज्यातील भाजपा महायुती सरकारला एक वर्ष पूर्ण होत आहे. मतचोरी करून सत्तेत आलेल्या सरकारची एका वर्षातच बौद्धिक व आर्थिक दिवाळखोरी निघाली आहे. सत्तेत येताना लाडक्या बहिणींना 2100 रुपये देणार, शेतकऱ्यांचे कर्जमाफ करणार, नोकर भरती करणार अशी आश्वासने दिली होती पण त्याचा आता महायुती सरकारला विसर पडला आहे. कोयता गँग, खोके, आका, वाळू माफिया, ड्रग्ज माफिया हे महायुती सरकारने राज्याला दिले आहे. जाती धर्मात वाद निर्माण करण्याचे काम सरकारने केले असून 'पैसा फेक तमाशा देख', हे वगनाट्य जोरात सुरु आहे.

पुण्यातील मुंढवा जमीन घोटाळ्यात अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांना वाचवण्यात येत असल्याचा आरोपही सपकाळ यांनी यावेळी केला. पुण्यातील मुंढवा जमीन खरेदी भ्रष्टाचार प्रकरणी शितल तेजवानी यांना केलेली अटक म्हणजे त्यांना बळीचा बकरा करण्यात आले आहे. या प्रकरणातील जमीन खरेदी करणाऱ्या कंपनीचा मालक उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार याच्यावर कसलीही कारवाई केलेली नाही व सरकार करणारही नाही, असेही ते म्हणाले.

नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी तपोवनातील शेकडो वृक्षांची कत्तल करणे म्हणजे अधर्म आहे. याच तपोवनात प्रभू रामचंद्र, मातासीता व लक्ष्मण यांनी वास्तव केल्याचे सांगितले जाते. या पवित्र वनातील झाडांची कत्तल करून भाजपा महायुती सरकार आपला अध्यात्मिक वारसाच संपुष्टात आणत आहे आणि हा अधर्म आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## औरंगाबाद विमानतळाच्या नामकरणाला 'ब्रेक'




**छत्रपती संभाजीनगर :** ऐतिहासिक औरंगाबाद शहराचे 'छत्रपती संभाजीनगर' असे नामकरण झाले, पाठोपाठ रेल्वे स्थानकाचेही नाव बदलण्यात आले. आता सर्वांचे लक्ष चिकलठाणा विमानतळाच्या नामकरणाकडे लागले आहे. केंद्र सरकारने या विमानतळाला 'छत्रपती संभाजीनगर विमानतळ' असे नाव देण्याचा निर्णय घेऊन त्यासंबंधीचे परिपत्रक काढले होते. मात्र, केंद्राने नाव बदलाचा निर्णय तात्पुरता स्थगित केला आहे. विमानतळाच्या नावात 'महाराज' या सन्मानसूचक शब्दाचा उल्लेख नसल्याने, केंद्र सरकारने काढलेली अधिसूचना (परिपत्रक) तूर्तास स्थगित करण्यात आली आहे.

केंद्रीय नागरी उड्डयन मंत्रालयाने नुकतेच एक परिपत्रक काढून विमानतळाचे नाव 'छत्रपती संभाजीनगर विमानतळ' असे निश्चित केले होते. मात्र, राज्याच्या विधिमंडळाने मंजूर केलेला ठराव आणि शिवप्रेमींच्या मागणीनुसार हे नाव 'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ' असे असणे अपेक्षित आहे. केवळ शहराच्या नावाने विमानतळ न ओळखता, त्यात 'महाराज' असा आदरयुक्त उल्लेख असावा, अशी आग्रही मागणी लोकप्रतिनिधींनी केली. त्यामुळे भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (AAI) सद्यस्थितीत ही नामकरण प्रक्रिया थांबवली आहे.

याबाबत बोलताना खासदार डॉ. भागवत कराड यांनी स्पष्ट केले की, "केंद्राच्या परिपत्रकात पूर्ण नाव नसल्याने आम्ही ते थांबवले आहे. आम्हाला 'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ' असेच पूर्ण नाव हवे आहे. यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत असून, लवकरच सुधारित परिपत्रक जारी होईल."

दरम्यान, मार्च २०२० मध्येच तत्कालीन राज्य मंत्रिमंडळाने विमानतळाचे नाव 'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ' असे करण्यास मंजुरी देऊन तो प्रस्ताव केंद्राकडे पाठवला होता. आता सुधारित आदेश निघाल्यानंतरच एअरलाईन्सची तिकीट यंत्रणा, विमानतळावरील फलक आणि वेबसाइटवर नावाचा अधिकृत बदल दिसून येईल. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष दिल्लीतून येणाऱ्या नव्या आदेशाकडे लागले आहे.

दरम्यान, नामकरणानंतर विमानतळाला शहराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाशी जोडणारा नवा दर्जा मिळेल. एअरलाईन्सच्या तिकीट आरक्षण प्रणालीमध्ये, नवीन फलकांवर, माहितीफलकांवर आणि वेबसाइटवर लवकरच हे नवे नाव दिसेल. सध्या 'छत्रपती संभाजी महाराज' या पूर्ण नावाच्या समावेशासाठी प्रक्रिया थांबवण्यात आल्यामुळे, आता सर्वांचे लक्ष केंद्र सरकारच्या 'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ' या नावाची अधिकृत घोषणा करणाऱ्या सुधारित परिपत्रकाकडे लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ डिसेंबर २०२५


## कालिकादेवी विद्यालयात, मा. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त निबंध व सामान्यज्ञान स्पर्धा संपन्न



**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर(का.) जि. बीड येथे जिल्ह्याचे लोकप्रिय नेते तथा माजी मंत्री मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात, "निबंध स्पर्धा व सामान्यज्ञान स्पर्धा"अशा दोन स्पर्धा संपन्न झाल्या. ह्या स्पर्धा विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या उपस्थितीत घेण्यात आल्या. निबंध स्पर्धा ही दोन गटात घेण्यात आली."लहान गटात" इ.5 वी ते 7 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.तर "मोठ्या गटात" इ.8 वी ते 10 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.लहान गटातून कु.श्रावणी विजयकुमार शिंदे हिने 'प्रथम क्रमांक' पटकावला.व कु.श्रावणी गणेश आघाव हिने 'द्वितीय क्रमांक' तर चि.अतुल विठ्ठल इंगळे या विद्यार्थ्याने 'तृतीय क्रमांक' मिळविला.तसेच "मोठ्या गटात" कु.अमृता अजिनाथ सव्वाशे हिने 'प्रथम क्रमांक' पटकावला व कु.आराध्या विठ्ठल गिते हिने 'द्वितीय क्रमांक' तर चि.शोएब शौकत आतार या विद्यार्थ्याने 'तृतीय क्रमांक'मिळविला.तसेच "सामान्य ज्ञान स्पर्धेत" इ.5 वी ते 7 वी या लहान गटात चि.अतुल विठ्ठल इंगळे याने 'प्रथम क्रमांक' पटकावला व कु.वेदिका संदीप गाडेकर हिने 'द्वितीय क्रमांक' तर चि.सागर विठ्ठल इंगळे या विद्यार्थ्याने 'तृतीय क्रमांक' मिळविला.आणि इ.8 वी ते 10 वी या मोठ्या गटातून चि.शोएब शौकत आतार व कु.सृष्टी अशोक भुसारे या दोघांनी विभागून 'प्रथम क्रमांक' पटकावला व चि.आशय अनिरुद्ध बडे याने 'द्वितीय क्रमांक' तर कु.आर्या बाबासाहेब ढाकणे हिने 'तृतीय क्रमांक' मिळविला.स्पर्धेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा. नामदेव तरकसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आत्माराम झिंजुर्डे व सौ.अनिता लाटे मॅडम, स्पर्धा प्रमुख श्री रवींद्र बडे,अप्पासाहेब कांबळे,प्रकाश राऊत, जयेंद्र निकम, वसंत आहेर यांनी यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, क. प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदिवासी समूह नृत्यात बहिरगाव— मालपुर शाळेचा जिल्ह्यात दुसरा क्रमांक



**मालपूर :** लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी कन्नड संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होतेयात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मालपुर केंद्र बहिरगाव येथील चिमुकल्यांनी सादर केलेल्या आदिवासी समूह नृत्य द्वितीय क्रमांक मिळाला आहे या गुणवंत विद्यार्थ्यांना आयपीएस अधिकारी श्रीमती अपराजिता अग्निहोत्री प्राचार्य विजय भोसले डॉक्टर मिलिंद पाटील या मान्यवरांच्या हस्ते तबला, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले . तसेच शाळेचे मा. मुख्याध्यापक श्री योगेश पवार सर यांनी विजयी नृत्य समुहास बक्षीस व मिठाई देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्री शब्बीर शेख सर, श्री भाऊसाहेब सोननीस सर श्री विकास साळुंके सर, कु.गायत्री सोननीस यांचे मार्गदर्शन लाभले होते, तसेच केंद्रप्रमुख श्रीमती अनिता जालनापुरकर, केंद्रीय मुख्याध्यापक श्री विजय पोतदार सर तथा केंद्रांतर्गत समस्त शिक्षक बंधू -भगिनी यांचे अनमोल सहकार्य लाभले. गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल उपसरपंच श्री. रविंद्र भाऊ बनकर राजू भाऊ बनकर ग्रामपंचायत बहिरगाव -मालपुर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा सदस्य व ग्रामस्थ तथा पालक. यांच्या वतीने या गुणवंत विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

**नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) :** पीपल्स वेल्फेअर सोसायटी नागपूर द्वारा संचालित डॉ. मधुकरराव वासनिक पी डब्ल्यू एस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कामठी रोड नागपूर द्वारा आयोजित दिनांक ५ व ६ डिसेंबर २०२५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केलेले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा गेल्या ५८ वर्षापासून अविरतपणे परमपूज्य विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भीमस्वरांजली व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमाला आयोजित केली आहे. समाजातील सर्व स्तरातील नागरिक व विद्यार्थी यांच्यापर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य कर्तुत्व आणि मौलिक विचारधन पोहोचविणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे करिता परिसरातील सर्व नागरिक व महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी यांनी या कार्यक्रमाकरिता आवर्जून उपस्थित राहावे, अशी विनंती आयोजकांनी केली आहे. शुक्रवार दिनांक ५डिसेंबर २०२५ ला भीम स्वरांजली या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. सादर करते प्रा. प्रज्ञा कोचे संगीत विभाग व माजी विद्यार्थी. शनिवार दिनांक ६ डिसेंबर २०२५ ला "भारतीय संविधान व धार्मिक सद्भावना. "या विषयावर ज्येष्ठ विधिज्ञ उच्च न्यायालय नागपूर एडवोकेट फिरदोस मिर्झा यांचे व्याख्यान सकाळी 9.30 वाजता आयोजित केलेले आहे. वरील दोन दिवसीय कार्यक्रमाकरिता महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहामध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ प्रज्ञा बागडे व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ डिसेंबर २०२५


## विभागस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत जेइएसचे यश



**जालना : प्रा डॉ राजेंद्र सोनवणे)** महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने १८ नोव्हेंबर २०२५ रोजी विभागस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जे ई एस महाविद्यालय जालना च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली . जालना जिल्हा तील जेइएसचे यशस्वी खेळाडू प्रथम क्रमांक आलेले व राज्यस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू १) कु. तेजल भागडे वय अंडर -१९, वजन गट -६३kg पहिला क्रमांकया विद्यार्थ्यानिचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना पर्यवेक्षक डॉ.

सुमन बिक्कड व प्रा. डी एम धनवे, क्रीडा शिक्षक प्रा.राहुल सारस्वत राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. राजेंद्र सोनवणे आदींनी अभिनंदन केले आहे.

## दिव्यांग सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे यांचा गौरव



**छत्रपती संभाजीनगर :** दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर यांच्यातर्फे उपशिक्षणाधिकारी श्रीमती तांदळे / भावसार यांना पुरस्काराने सन्मानित दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी श्रीमती गिता तांदळे मॅडम यांना जिल्हा सक्षमीकरण पुरस्कार माननीय नामदार अतुलजी सावे व माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद श्री अंकित सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले आहेत या कार्यक्रम प्रसंगी माननीय श्री दीपक खरात प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग व माननीय श्री बाबासाहेब अरवत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी छत्रपती संभाजीनगर आदी मान्यवर उपस्थित होते. श्रीमती गीता तांदळे मॅडम उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर यांना जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती जयश्री चव्हाण मॅडम आणि शिक्षणाधिकारी माध्यमिक श्रीमती लाटकर मॅडम यांनी व सर्व अधिकारी कर्मचारी तसेच केंद्र स्तर विशेष शिक्षक यांनी शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थ्यांच्या तत्परेतुळे वाचले जखमी उद मांजराचे प्राण



जखमी अवस्थेतील उद मांजर

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील गोगाबाबा टेकडीवर सकाळी फिरत असलेल्या विद्यार्थ्यांना एक जखमी अवस्थेतील उद मांजर दिसून आले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेत तात्काळ वन विभागाशी संपर्क साधण्यात आला.सूचना मिळताच वन अधिकारी आशिष जोशी यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी उद मांजराचे रेस्क्यू ऑपरेशन यशस्वीरित्या पार पाडले. वन विभागास ही माहिती हाक फाऊंडेशन चे अध्यक्ष सादिक शेख, अंकुश सोनवणे, प्रवीण वाघ, तसेच डॉ. मारुती गिरीशेठी यांनी दिली.



बचावानंतर प्राण्याला आवश्यक वैद्यकीय उपचारांसाठी वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले असून त्याच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. या तात्काळ व संवेदनशील कारवाईबद्दल परिसरातील नागरिकांनी वन विभागाचे कौतुक केले आहे.

## कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाच्या संत तुकाराम अध्यासन केंद्राचे 'तुका म्हणे' पुरस्कार जाहीर





**कन्नड :** येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड संचलित शिवाजी कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंतर्गत मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र पुरस्कृत संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्र स्थापन करण्यात येवून या अध्यासन केंद्राच्या वतीने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. संत तुकाराम महाराज व्याख्यानमाला, राज्यस्तरीय चर्चासत्र , परिसंवाद, अभ्यासवृत्ती, ' त्याबरोबरच 'तुका म्हणे 'पुरस्कार ही दरवर्षी देण्यात येतो. २०२३ ते २०२४ या वर्षात प्रसिद्ध झालेल्या संत साहित्यावर आधारीत पुस्तकांना तुका म्हणे पुरस्कार देण्याचे ठरले होते. त्यासाठी प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. या पुरस्कारासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील नामवंत अभ्यासकांच्या २ २ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. पहिल्या पुरस्काराच्या मानकरी म्हणून पुणे येथील संत साहित्याच्या अभ्यासिका डॉ. अलका चिटगोपकर यांच्या मध्ययुगीन मराठी संत कवयित्रींची काव्यधारा या ग्रंथास जाहीर करण्यात आला आहे. तर २०२४ - २०२५ या वर्षातील पुरस्कारासाठी महंत बा. भो. शास्त्री चिंतनी जनक यांची निवड करण्यात आली आहे. महंत बा. भो. शास्त्री हे महानुभाव व वारकरी संत साहित्याचे अभ्यासक आहेत. चिंतनीजनक म्हणून ते ओळखले जातात तसेच ते मराठीतील साहित्यिक ही आहेत. त्यांचे ३५ पेक्षा अधिक पुस्तके प्रसिद्ध आहेत. कथा, कविता, कादंबरी, चरित्र , आत्मचरित्र , वैचारिक साहित्य प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. झांजर या कादंबरीस महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार व शासनाचा अतिशय प्रतिष्ठेचा ज्ञानोबा - तुकोबा पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. कीर्तन, प्रवचनकार तसेच प्रभावी तत्वचिंतक - वक्ते म्हणून ही ते ओळखले जातात. त्यांच्या समग्र योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्काराचे स्वरूप पाच हजार रुपये रोख रक्कम स्मृतिचिन्ह, व सन्मानपत्र आणि शॉल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. १५ जानेवारी रोजी हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. अलका चिटगोपकर या बीड येथील संत बंकटस्वामी महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख म्हणून २००९ पर्यंत त्या कार्यरत होत्या. त्यांचे संत साहित्यावर आधारीत अनेक ग्रंथ प्रकाशित असून काव्य, ललित आणि समिक्षात्मक लेखन प्रकाशित झालेले आहेत. संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राच्या पुरस्कार निवड समितीची बैठक प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होऊन त्यात या पुरस्काराची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राचे व मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, समन्वयक डॉ. रामचंद्र झाडे यांनी दिली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ डिसेंबर २०२५

# डॉ. सुर्यकांत रेवते लिखित संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन संपन्न



**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात कार्यरत संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सुर्यकांत रेवते लिखित संदर्भ पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांचे हस्ते नुकतेच करण्यात आले. डॉ. रेवते यांनी लिखित डेटा सायन्स व मशीन लर्निंग वर आधारित बेसिक ऑफ आर प्रोग्रामिंग बिगीनर्स या संदर्भ ग्रंथाचे विमोचन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. डॉ. पी. ए. पिठले, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. बापू मोरे, प्रा. डॉ. ए. एस. पदमपल्ले, डॉ. धनंजय माने, डॉ. विनोद देवकर, प्रा. डॉ. भरत शेळके, प्रा. अबरार कादरी, प्रा. श्रद्धा पाटील, प्रा.फारुख मुल्ला, प्रा. आरती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. या संदर्भ ग्रंथाचे बी. एससी., बी. टेक.आणि बी. ई.व अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच डेटा सायन्स व मशीन लर्निंग क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता त्याचबरोबर संशोधक, अभ्यासकांसाठी अत्यंत उपयोगी ठरणार आहे.

# भडकलगेट येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबीर




**छत्रपती संभाजीनगर :** महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ६६ व्या महापारिनिर्वाण दिनानिमित्त शनीवार दि.६ डिसेंबर रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या वतीने मिलिंद नागसेनवन स्टुडंन्ट्स वेलफेयर असोसिएशन व रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या च्या सहकार्यातून रक्तदान करून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्याचा संकल्प केला असून उपक्रमाचे हे १० वे वर्ष असल्याची माहिती आयोजक सचिन निकम यांनी दिली आहे.भडकलगेट येथील संविधान प्रास्ताविकेच्या समोर सकाळी १० ते ०५ यावेळेत हे शिबिर होणार असून मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.यावेळी शासकीय रक्तपेढी अहमदनगर व शासकीय रुग्णालय, छ. संभाजीनगर यांच्या वतीने रक्तसंकलन करण्यात येणार आहे. रक्तदात्याना रक्तगट तपासणी, मोफत रक्तपिशवी व सवलतीचे ओळखपत्र देण्यात येणार आहे. रक्तदानामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाचा जीव वाचल्याने वैद्यकीय उपचारांना मदत होऊ शकते. ते गरजूंना जीवनरेखा प्रदान करते त्यामुळे १८ते ६५ वयोगटातील किमान 50 किलो वजन असलेल्या स्त्री-पुरुष रक्तदान केलेच पाहिजे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून या माध्यमातून अस्पृश्यता नाकारण्याचा मोठा संदेश जात असल्याने आंबेडकरी अनुयायांनी रक्तदानातून अभिवादन करावे असे आवाहन कुणाल भालेराव, प्रा. प्रबोधन बनसोडे, राष्ट्रपाल गवई, बालाजी सोनवणे, प्रा.सागर गायकवाड, हेमंत मोरे आदींनी केले आहे.




# चिंचेचं झाड

शेताच्या बांधावर
चिंचेचं झाड
रोज पाणी घालून
पुरवू त्याचे लाड

काही दिवसांनी झाड
दिसे डेरेदार
हिरव्या पानांची
सावली पडे गार

झाडाला लागले
चिंचांचे आकडे
धुमाकूळ घाली
खट्याळ माकडे

हवा सुटता
चिंचा झोके घेई
चिंचा पाडण्याची
मुलांचा भलतीच घाई

गाभोळलेल्या चिंचा
मुलांना भारी आवडे
मोठ्यांना मात्र
चिंचाचे वावडे



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०५ डिसेंबर २०२५


## अतिवृष्टी भागातील विद्यार्थ्यांचे एसएससी व एचएससी बोर्डाने परीक्षा शुल्क माफ करावे - डॉ. राजेंद्र सोनवणे



**जालना** : राज्यात शासनाने अतिवृष्टी झालेल्या भागात ओला दुष्काळ जाहीर केलेला आहे, या महाराष्ट्रातील भूभागातील जिल्ह्यात विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ केलेले आहे, याचप्रमाणे एसएससी व एचएससी बोर्डाने ही विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे किंवा ते घेतले परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांना परत करावे, अशी मागणी डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी एका पत्राने शालेय शिक्षण मंत्री नामदार श्री.दादा भुसे यांच्याकडे केलेली आहे . या परीक्षा शुल्क माफ केल्यामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल असे जेइएस महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना यांनी सांगितले आहे. अशाच प्रतिक्रिया विद्यार्थी कार्यकर्ते संघटनेचे डॉ. बाबासाहेब वाघ, प्रा. संतोष नजन, प्रा. श्याम गिरी, प्रा. शंकर माने, प्रा. गजानन बाविस्कर आदींनी दिली आहे.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# स्वयंसेवा : सामाजिक परिवर्तनाचा निस्वार्थ प्रवास

समाजाची खरी ताकद ही फक्त त्याच्या आर्थिक, भौतिक किंवा तांत्रिक प्रगतीत नसते, तर समाजातील लोकांची एकमेकांसाठी असलेली संवेदनशीलता, नाती, कर्तव्यभावना आणि परस्पर सहयोगी संस्कृती यांत असते. व्यक्तीला व्यक्तीशी जोडणारा आणि समाजाला अधिक मानवी बनवणारा जो सर्वात महत्त्वाचा सेतू आहे, तो म्हणजे 'स्वयंसेवा' होय. आधुनिक जगातील वाढत चाललेला व्यक्तिकेंद्रीवाद, उपभोक्तावाद आणि भौतिक स्पर्धा यांच्या गर्जनेतही स्वयंसेवेचे निस्वार्थ मूल्य अजूनही अढळ आहे आणि हीच स्वयंसेवेची माती जागतिक पातळीवर समाजातील बदलांचे बीज रोवते. स्वयंसेवेचे महत्व अधोरेखित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने 05 डिसेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन' म्हणून घोषित केला. स्वयंसेवकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आपल्याला या सामाजिक कार्यकर्त्यांच्या योगदानाची जाण करून देतो आणि अधिकाधिक लोकांना समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देतो.स्वयंसेवा म्हणजे केवळ एखाद्या संस्थेशी जोडले जाणे किंवा त्यांच्या माध्यमातून काम करणे एवढेच नव्हे; ती एक मानवी प्रवृत्ती आहे. स्वयंसेवा ही नोकरी नसते, त्यासाठी पगार नसतो; पण त्यात समाधान, आत्मिक आनंद आणि समाजकारणाची अनुभूती असते. व्यक्ती जेव्हा निस्वार्थपणे, कोणतेही भौतिक अपेक्षा न ठेवता समाजातील इतरांच्या कल्याणासाठी काम करते, तेव्हा त्या कार्यात निर्माण होणारा मूल्यांचा, अनुभवांचा आणि भावनांचा संयोग समाजबांधणीची मूळ व्याख्या तयार करतो. समाजशास्त्रीय दृष्टीने स्वयंसेवा ही सामाजिक ऐक्य, सहकार्य, समता आणि मानवी हक्कांच्या संरक्षणाला बळ देणारी प्रक्रिया आहे. ती सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी नागरी समाजाला सक्रिय करते आणि लोकतांत्रिक मूल्ये दृढ करते.भारतातील लोकजीवनात स्वयंसेवेची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. आपल्याकडे दान, सेवा, सहकार्य, परोपकार यांना नेहमीच सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. धर्म, अध्यात्म, संतपरंपरा, भिक्षादान, अन्नदान, वृक्षारोपण, जलसंधारण, वाचनालये, लोकशिक्षण, स्वातंत्र्यलढा या सर्व क्षेत्रांत स्वयंसेवकांनी निभावलेली निर्णायक भूमिका महत्त्वाची असून यासाठी इतिहास साक्षीदार आहे. महात्मा गांधींच्या 'सर्वोदय' आणि 'सार्वजनिक कल्याण' या संकल्पनांनी स्वयंसेवेचे व्यापक आणि वैज्ञानिक रूप स्पष्ट केले. आधुनिक काळातील स्वयंसेवा ही केवळ लोककल्याणापुरती मर्यादित नसून, ती पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, बालहक्क, मानवाधिकार, अपंगकल्याण, प्राणीसंवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, आणि जनसहभागाच्या सर्व बाबींमध्ये अत्यंत परिणामकारक ठरलेली आहे. सामाजिक बांधिलकी जपण्याची भूमिका निभावताना स्वयंसेवक समाजातील विषमता आणि अन्यायाविरुद्ध जनजागृती करतात, सत्ता आणि प्रशासनाला उत्तरदायी ठेवतात, तसेच दुर्लक्षित समुदायांना आधार देण्यासाठी पुढाकार घेतात.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता स्वयंसेवा सामाजिक भांडवल निर्माण करते. समाजातील विश्वास, नातेसंबंध आणि एकात्मता वाढविण्यात स्वयंसेवेची क्षमता अद्वितीय आहे. स्वयंसेवक जेव्हा एखाद्या समस्येला भिडतात, तेव्हा ते फक्त त्या समस्येचा उपचार करत नाहीत, तर त्या समस्येच्या कारणांचा वेध घेतात. त्यामुळे सामाजिक बदलाची प्रक्रिया गतीमान होते. स्वयंसेवेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे या माध्यमातून नागरीकांमध्ये 'असण्याची' आणि 'योजनेचा सक्रिय भाग असल्याची' भावना मजबूत होते. हीच भावना व्यक्तीला समाजाच्या विकासात स्वतःचे अस्तित्व अधोरेखित करण्याची प्रेरणा देते.स्वयंसेवेची आवश्यकता आज अधिक तीव्रतेने जाणवते कारण जग वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान आणि अर्थकारणाच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीमुळे अनेक नवीन सामाजिक प्रश्न उभे राहत आहेत. बेरोजगारी, मानसिक आरोग्य, कुपोषण, नैसर्गिक आपत्ती, डिजिटल दरी, भटक्या विमुक्त समुदायांचे प्रश्न, वृद्धांची काळजी, मुलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, जलवायू परिवर्तन आणि प्रदूषण अशा अनेक समस्या सरकार किंवा प्रशासन एकटी हाताळू शकत नाहीत. हे सत्य आपण कोविड-१९ महामारीच्या काळात प्रत्यक्ष अनुभवले, जेव्हा स्वयंसेवकांनी आरोग्य यंत्रणेसोबत हातात हात घालून मोठ्या प्रमाणात जनतेला मदत केली. रुग्णालयांमध्ये मदत, अन्नदान, औषध व ऑक्सिजनची उपलब्धता करून देणे, जनजागृती मोहीमा, समुपदेशन या सर्व आघाड्यांवर कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांनी समाजातील आशेचा दिवा प्रज्वलित ठेवला.आज स्वयंसेवा ही युवांची ओळख बनत चालली आहे. तरुणाईच्या ऊर्जेला योग्य दिशा देणारी ही एक महत्त्वाची संधी आहे. राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्रसेना (NCC), रेडक्रॉस, स्काउट-गाईड, युवा मंडळे, स्वयंसेवी संस्था (NGO) यांच्यामाध्यमातून लाखो युवक समाजकार्यात सक्रिय झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून निर्माण झालेले नेतृत्व सामाजिक परिवर्तनाचे इंजिन बनले आहे. स्वयंसेवा युवकांना जीवनदृष्टी देताना समाजाला विकासाचा हात देत राहते. तरुणांची नवोन्मेषी विचारशक्ती आणि स्वयंसेवेची संवेदनशीलता यांचे एकत्रीकरण हे समाजहिताचे सर्वात मजबूत सूत्र आहे.पण स्वयंसेवेच्या या तेजस्वी चित्रामागे काही आव्हाने देखील आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था पारदर्शकतेअभावी किंवा राजकीय स्वार्थाच्या विळख्यात अडकतात, तर काही ठिकाणी स्वयंसेवकांचे शोषणही होते. योग्य प्रशिक्षण, सुरक्षा आणि मानसिक आधाराची कमतरता दिसून येते. तसेच, स्वयंसेवा ही फक्त सामाजिक प्रतिमा निर्माण करण्याचे साधन आहे, असा गैरसमजही कुठेकुठे आढळतो. म्हणूनच स्वयंसेवेचे संस्थाकरण करताना मूल्यशिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, तसेच नैतिक तत्वांचा आग्रह ही आवश्यक बाब आहे. स्वयंसेवा म्हणजे फक्त फोटो काढून सामाजिक माध्यमांवर टाकणे नव्हे; तर प्रत्यक्ष जिथे तुटलेल्या हातांना आधार द्यायचा आहे, जिथे डोळे आसवे पुसण्याची वाट पाहत आहेत, जिथे एखादी आकांक्षा उजेडाच्या शोधात आहे, तिथे पोहोचणे हे स्वयंसेवेचे खरे ध्येय आहे.स्वयंसेवेची व्यापक स्वीकार्यता वाढवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपली भूमिका जागृत केली पाहिजे. कुटुंबातील मूल्यशिक्षण, शाळा-कॉलेजमधील सामाजिक उपक्रम, प्रशासनाची सहकार्यनीती, माध्यमांची सकारात्मक भूमिका, आणि नागरी समाजाचे भान या सर्वांचा समन्वय आवश्यक आहे. व्यक्तीच्या विकासात स्वयंसेवेची थेट भूमिका आहे कारण स्वयंसेवा व्यक्तीला आत्मनिष्ठा, संवेदनशीलता, जबाबदारीची जाणीव, नेतृत्वगुण आणि सामाजिक ज्ञान यांचे भांडार उपलब्ध करून देते. त्यातून निर्माण होणारी 'सोशल आयडेंटिटी' व्यक्तीचे जीवन अधिक अर्थपूर्ण करते.मानवतेचे अस्तित्व टिकवायचे असेल, तर समाजात परस्पर सहकार्याची संस्कृती अधिक दृढ करावी लागेल. स्वयंसेवेची शक्ती ही फक्त देण्यात नसून जोडण्यात आहे. ती वर्ग, जात, धर्म, भाषा, लिंग, वंश अशा सर्व भिंती मोडून टाकते आणि सर्वांना समान दर्जा देते. स्वयंसेवक जेव्हा एखाद्या घरात अन्नाचा तुकडा पोहोचवतात, तेव्हा त्या घरातील माणसांमध्ये समाजाविषयी विश्वास निर्माण होतो. जेव्हा ते एखाद्या मुलाला शिक्षण मिळवून देतात, तेव्हा त्या मुलाच्या भविष्यात आशेचा दिवा पेटतो. जेव्हा ते जखमी निसर्गाला वृक्षारोपणाद्वारे मोबदला देतात, तेव्हा पृथ्वीचा श्वास दीर्घकाळ टिकतो. ही शक्ती कोणत्याही योजना, बजेट किंवा धोरणाने निर्माण केली जाऊ शकत नाही ती फक्त मनाने दिलेली असते.'आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन' आपल्याला आठवण करून देतो की प्रत्येक व्यक्ती समाजासाठी महत्त्वाची आहे. आपल्या थोड्याश्या प्रयत्नात कोणाचातरी संपूर्ण जग दडलं असतं. आज जगात करोडो स्वयंसेवक आपली स्वार्थरहित सेवा देत आहेत आणि मानवी मूल्यांचा झेंडा उंचावत आहेत. त्यांची ही कृतिशीलता समाजाला दिशा देते, मानवतेला आधार देते आणि भविष्यासाठी आशेचा किरण ठरते. या दिवशी समाजातील सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून आपण सर्वांनीही आपल्या क्षमतेनुसार समाजासाठी काहीतरी करण्याचा संकल्प करायला हवा.जग बदलण्यासाठी मोठ्या क्रांतीची गरज नसते; एखादी छोटी सेवा, एखादे घेतलेले पाऊल, एखादे समजूतदार नाते — एवढ्यानेही परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. कधी कधी एखाद्याची स्मितही जग बदलू शकते. म्हणूनच, आजचा दिवस आपल्याला पुन्हा एकदा सांगतो सेवा ही मानवतेची खरी भाषा आहे. आपण सर्वांनी एकमेकांसाठी जगलो, तर जगही आपल्यासाठी जगेल. "मनाची उदारता म्हणजेच स्वयंसेवा, आणि स्वयंसेवा म्हणजेच मानवतेचा सर्वात सुंदर चेहरा होय." या व्रताला, या संस्काराला, या मानवी मूल्याला शतशः वंदन!




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मो. 9960103582

bagate.rajendra५@gmail.com